समग्र शिक्षा अंतर्गत शाळा खोल्या बांधकाम व शाळाखोली मोठी दुरूस्ती-

समग्र शिक्षा अंतर्गत मंजूर बांधकामे वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकानुसार यु-डायस प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने समाविष्ट केलेल्या वर्गखोल्या मागणी, स्वच्छतागृह, मोठी दुरूस्ती, सौर ऊर्जा संच, विद्युत सुविधा शिक्षकांचे निवासस्थान इ.आवश्यकतेनुसार शाळा प्रती वर्षी आराखडयामध्ये याबाबींचा समावेश करण्यात येतो. सदरील यादी भारत सरकार शाळानिहाय युनिट कॉस्टसह प्रशासकीय मान्यता राज्यस्तरावरून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेमार्फत देण्यात येते. सदर बांधकामांच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी समग्र शिक्षा अंतर्गत कार्यकारी अभियंता व कनिष्ठ अभियंता यांची असेल.

**<u>योजनेचे स्वरुप :-</u>**

जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधरण ) अंतर्गत राबविण्यात येणा-या 1) प्राथमिक शाळा इमारत बांधकाम 2) प्राथमिक शाळांची दुरुस्ती.

जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधरण ) अंतर्गत राबविण्यात येणा-या योजनांमध्ये वर्गखोली बांधकाम / दुरुस्ती , स्वच्छतागृह बांधकाम / दुरुस्ती , पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, खेळाचे मैदान , आवारभिंत /कुंपन, स्वयपाकगृह, उताराचा रस्ता (रॅम्प ) विदयुतीकरण या मूलभूत सोयीसुविधा अंतभूत आहेत.

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत शासकीय लेखासंकेतांक क्रमांक 2202 एच 001 प्राथमिक शाळेच्या इमारतीसाठी जिल्हा परिषदेला या लेखाशिर्षाखाली अनुदान प्राप्त होते. प्राथमिक शाळेची प्राधान्यक्रम यादी नुसार वर्गखोल्या मान्य केल्या जातात. गटशिक्षणाधिकारी यांचेकडील अहवालानुसार प्राथमिक शाळेची प्राधान्यक्रम यादी तयार करण्यात येते व प्राधान्यक्रमानुसार नविन शाळा बांधकामास प्रशाकीय मान्यता देण्यात येते.

.जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत शासकीय लेखासंकेतांक क्रमांक 2202 एच 561 प्राथमिक शाळा दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेला या लेखाशिर्षाखाली अनुदान प्राप्त होते.गटशिक्षणाधिकारी यांचेकडुन प्राथमिक शाळेची दुरुस्तीची प्राधान्यक्रम यादी तयार करण्यात येते व प्राधान्यक्रमानुसार शाळा दुरुस्तीस कामास प्रशाकीय मान्यता देण्यात येते.

**समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद अहमदनगर**

**पर्यायी शिक्षण**

**योजनेचे नाव** : **शाळाबाहय व स्थलांतरीत विदयार्थी** : (Out of School & Migrated Children)

**स्वरुप** - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 लागू करण्यात आला आहे. सदर कायदयाच्या अनुषंगाने राज्य नियामावली 2011 तयार केली असून ती दि. 31 ऑक्टोंबर 2011 पासून राज्यात लागू केली आहे. त्यातील तरतूदीनूसार 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालक प्राथमिक शाळेत दाखल केले पाहिजे. परंतु यामध्ये स्थलांतर, शाळाबाहय, अनियमित, आजारपण व वय जास्त या व यासारख्या कारणांमुळे मुले शाळाबाहय होतात. शाळाबाहय झालेल्या विदयार्थ्यांना शाळेत वयानुरुप वर्गात दाखल केले जाते. त्यासाठी त्या विदयार्थ्यांना तीन / सहा / नऊ महिने असे विशेष प्रशिक्षण देवून वयानुरुप वर्गात दाखल करुन त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते.

निकष : साधारणपणे ऑक्टोंबर ते मार्च या सहा महिन्याच्या कार्यकाळामध्ये पालकांचे व्यवसाय निमित्त किंवा काही कामधंदयानिमित्त स्थलांतर होत असते. त्यांच्याबरोबर त्यांचे मुलेही स्थलांतर करत असतात. त्यामुळे मुले शाळाबाहय होत असतात. या विदयार्थ्यांना ज्या ठिकाणी स्थलांतर झाले आहे त्या ठिकाणच्या नजिकच्या शाळेमध्ये त्यांना प्रवेश दिला जातो. त्यांच्या प्रगतीची नोंद शिक्षण हमी कार्डवर केली जाते.

## योजनेचे नाव - मोफत पाठ्यपुस्तक

**योजनेचे स्वरूप -**

केंद्र शासनाच्या निकषानुसार समग्र शिक्षा अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तक हा उपक्रम इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी च्या सर्व शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था,शासन अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेतील सर्व मुलांसाठी राबविला जातो.

**योजनेचे निकष -**

समग्र शिक्षा अंतर्गत सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व शासन अनुदानित शाळेतील सर्व इयत्ता १ ली ते ८ वीचे विद्यार्थी.

# समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, अहमदनगर

- **<u>संयुक्त शाळा अनुदान प्राथमिक (इ. 1 ते 8)</u>**

मा.राज्य प्रकल्प संचालक, म.प्रा.शि.प.मुंबई यांच्या कार्यालयाच्या संदर्भिय पत्रान्वये संयुक्त शाळा अनुदान (Composite School Grant) हे सर्वात वरचा वर्ग इयत्ता 8 वी चा असणाऱ्या शासकीय प्राथमिक शाळांना शाळेच्या पटसंख्येच्या निकषानुसार मंजूर करण्यात आले आहे. संयुक्त शाळा अनुदान हे शासकीय आदिवासी विकास विभागाने चालविलेल्या आश्रमशाळा, समाज कल्याण विभागाच्या शाळा, विद्यानिकेतन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळासाठी मंजूर आहे.

शाळा अनुदानाचा विनियोग हा शाळेतील नादुरूस्त असलेल्या भौतिक वस्तू दुरूस्त करणे तसेच इतर आवर्ती खर्च खेळाचे साहित्य, गेम्स साहित्य, क्रीडा साहित्य, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य खरेदी करणेकरीता करता, वार्षिक देखभाल शाळा इमारत, शौचालय दुरूस्ती, इतर भौतिक सुविधा सुस्थितीत ठेवण्यासाठी करता येईल. यामधून भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळ (PAB) ने दिलेल्या मंजूरीनुसार सदर उपक्रमाकरिता मंजूर असलेल्या एकूण निधीच्या 10% निधी हा स्वच्छ कार्य योजना यासाठी करणेबाबत शाळास्तरावर सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सध्या राज्यात व सबंध देशामध्ये पसरत असलेला कोरोना विषाणुंचा (Covid-19) या साथीच्या आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, मूलभूत सुविधांच्या तरतूदीकरीता विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हात धुण्यासाठी द्रव्यस्वरूपातील अत्यावश्यक वस्तू उदा. Like Soap, alcohol rub/hand sanitizer आणि chlorine solution च्या वापराकरिता.

त्यानुसार जिल्ह्यातील **अ**) 01 ते 30 पट संख्या असलेल्या शाळांना रू.5,000/- प्रमाणे, **ब**) 31 ते 100 पट असलेल्या शाळांना रू. 12,500/- प्रमाणे **क**) 101 ते 250 पट असलेल्या शाळांना रू. 25,000/- प्रमाणे **ड**) 251 ते 1000 पट असलेल्या शाळांना रू. 37,500/- या प्रमाणे मंजूर करण्यात आले आहे.

समग्र **शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, अहमदनगर**

- **संयुक्त शाळा अनुदान माध्यमिकस्तर (इ. 9 ते 12)**

मा.राज्य प्रकल्प संचालक, म.प्रा.शि.प.मुंबई यांच्या कार्यालयाच्या संदर्भिय पत्रान्वये संयुक्त शाळा अनुदान (Composite School Grant) हे सर्वात वरचा वर्ग इयत्ता 10 वी किंवा 12 वी पर्यंतचे वर्ग असलेल्या शासकीय माध्यमिक शाळांना शाळेच्या पटसंख्येच्या निकषानुसार मंजूर करण्यात आले आहे. संयुक्त शाळा अनुदान हे शासकीय आदिवासी विकास विभागाने चालविलेल्या आश्रमशाळा, समाज कल्याण विभागाच्या शाळा, विद्यानिकेतन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळासाठी मंजूर आहे.

शाळा अनुदानाचा विनियोग हा शाळेतील नादुरूस्त असलेल्या भौतिक वस्तू दुरूस्त करणे तसेच इतर आवर्ती खर्च खेळाचे साहित्य, गेम्स साहित्य, क्रीडा साहित्य, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य खरेदी करणेकरीता करता, वार्षिक देखभाल शाळा इमारत, शौचालय दुरूस्ती, इतर भौतिक सुविधा सुस्थितीत ठेवण्यासाठी करता येईल. यामधून भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळ (PAB) ने दिलेल्या मंजूरीनुसार सदर उपक्रमाकरिता मंजूर असलेल्या एकूण निधीच्या 10% निधी हा स्वच्छ कार्य योजना यासाठी करणेबाबत शाळास्तरावर सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सध्या राज्यात व सबंध

देशामध्ये पसरत असलेला कोरोना विषाणुंचा (Covid-19) या साथीच्या आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, मूलभूत सुविधांच्या तरतूदीकरीता विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हात धुण्यासाठी द्रव्यस्वरूपातील अत्यावश्यक वस्तू उदा. Like Soap, alcohol rub/hand sanitizer आणि chlorine solution च्या वापराकरिता.

त्यानुसार जिल्ह्यातील **अ**) 31 ते 100 पट असलेली शाळेला रू.12,500/- प्रमाणे, **ब**) 101 ते 250 पट असलेल्या शाळांना रू. 25,000/- प्रमाणे **क**) 251 ते 1000 पट असलेल्या शाळांना रू. 37,500/- प्रमाणे जिल्ह्यातील निकष पात्र शाळांना तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत शाळा व्यवस्थापन विकास समितीला वर्ग व मंजूर करण्यात येते.

- गट **साधन केंद्र** (BRC) :- 1) <u>सादील अनुदान (Contingency Grant)</u> या उपक्रमाकरिता राज्यावरून प्रत्येक गटसाधन केंद्राकरीता प्रत्यक्षात रु.30,000/- प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून या अनुदानातून जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था यांना एकूण अनुदानातून 10% व गट साधन केंद्रासाठी आवश्यक स्टेशनरी, झेरॉक्स, वीज बील, आकस्मिक खर्च, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंमलबजावणी इ. साठी 90% निधी खर्च करण्याच्या सुचना आहेत.

  2) <u>बैठक, प्रवास भत्ता (Meeting, TA)</u> - या उपक्रमाकरिता राज्यावरून प्रत्येक गट साधन केंद्राकरिता प्रत्यक्षात रू.30,000/- प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उपलब्ध अनुदानातून गट साधन केंद्रांतर्गत तसेच जिल्हा व राज्यस्तरावरील बैठकांना समग्र शिक्षा मधील कर्मचारी (गट/शहर साधन केंद्र स्तरावरील करार कर्मचाऱ्यांचे कार्यक्षेत्र वगळता) यांना उपस्थित राहण्यासाठी नियमानुसार अनुज्ञेय प्रवास खर्च तसेच गट साधन केंद्र स्तरावर आयोजित बैठकांसाठी येणारा आवश्यक खर्च (चहा, अल्पोपहार इ.) वर करण्यात येतो.

- **<u>गट साधन केंद्र अध्ययन अध्यापन साहित्य</u>** - या उपक्रमाकरिता राज्यावरून प्रत्येक गट साधन केंद्राकरीता प्रत्यक्षात रू. 10,000/- प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीच्या विनियोगाबाबतच्या मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेमार्फत स्वतंत्रपण निर्गमित करण्यात येतात त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते.

  तसेच समग्र शिक्षा अंतर्गत गट/तालुकास्तरावर कार्यरत विषय साधनव्यक्ती, समावेशित शिक्षण विशेष तज्ञ, एम आय एस.कॉर्डीनेटर, डाटा एन्ट्री ऑपरेटर नि.सहाय्यक तसेच विशेष शिक्षक यांचे मानधन अदा करण्यात येते.

- **समूह साधन केंद्र** (CRC):- 1) <u>सादील अनुदान (Contingency Grant)</u> या उपक्रमाकरिता राज्यावरून प्रत्येक समूह साधन केंद्राकरीता प्रत्यक्षात रु.15,000/- प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात आला समूह साधन केंद्रासाठी आवश्यक स्टेशनरी, झेरॉक्स, वीज बील, आकस्मिक खर्च, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंमलबजावणी इ. साठी निधी खर्च करण्याच्या सुचना आहेत.

  2) <u>बैठक, प्रवास भत्ता (Meeting, TA)</u> - या उपक्रमाकरिता राज्यावरून प्रत्येक समूह साधन केंद्राकरिता प्रत्यक्षात रू.15,000/- प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उपलब्ध अनुदानातून समूह साधन केंद्रांतर्गत तसेच गट व जिल्हा राज्यस्तरावरील बैठकांना उपस्थित राहण्यासाठी नियमानुसार अनुज्ञेय प्रवास खर्च तसेच गट साधन केंद्र स्तरावर आयोजित बैठकांसाठी येणारा आवश्यक खर्च (चहा, अल्पोपहार इ.) वर करण्यात येतो.

- **<u>अध्ययन अध्यापन साहित्य</u>** - या उपक्रमाकरिता राज्यावरून प्रत्येक समूह साधन केंद्राकरीता प्रत्यक्षात रू. 5,000/- प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीच्या विनियोगाबाबतच्या मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेमार्फत स्वतंत्रपण निर्गमित करण्यात येतात त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते.

## योजनेचे नाव -शिक्षक प्रशिक्षण

- सदर योजना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर मार्फत राबविली जात आहे.

# समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहमदनगर

**<u>योजनेचे नाव -NIPUN (National Initiative For Proficiency in Reading With Understanding and Numeracy) Bharat -मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान</u>**

**निकष -राष्ट्रीय** शैक्षणिक धोरण सन 2020 नुसार, प्राथमिक स्तरावर सन 2026-27 पर्यंत मुलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. यात प्राथमिक पातळीवरील अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त केले नाही, असे ठळकपणे नमूद आहे. वय वर्षे 3 ते 9 वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी त्वरीत एक राष्ट्रीय अभियान राबवून त्याची राज्यामध्ये अंमलबजावणी करणे आवश्यक. आहे. सदर अभियानात विद्यार्थी, पालक, शाळा, शिक्षक व समाज या सर्वांनी सर्वकष पुढाकार घेऊन राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणाचा पाया मजबूत करणे गरजेचे आहे.

त्यासाठी **भारत सरकारने "समग्र शिक्षा" मध्ये निपुण भारत (National Initiative For Proficiency In Reading With Understanding and Numeracy) अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता** 3 **री पर्यंत मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान सन** 2026-27 **पर्यंत प्राप्त करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे**.

**स्वरूप**-

**"निपुण भारत" अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यास शासनाने मान्यता देत असून पुढीलप्रमाणे दिशानिर्देश करीत आहे** :

1. **भाषिक कौशल्ये**:- 3 ते 9 वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचा प्रारंभिक भाषा विकास होण्यासाठी मातृभाषेमध्ये मौखिक भाषा ज्ञान, समजपूर्वक ऐकणे व त्याचे आकलन, मुद्रणशाख उच्चारशास्त्र यांच्या विकासाची जाणीव व लेखन कौशल्याचा विकास होणे गरजेचे आहे. भाषिक कौशल्ये प्राप्त होण्यासाठी भाषेचे पूर्वज्ञान मदतगार ठरेल. ज्या विद्यार्थ्यांचा मातृभाषेचा पाया मजबूत असतो, ते विद्यार्थी इंग्रजी वा अन्य भाषा अधिक सहजतेने शिकू शकतात.

**पायाभूत साक्षरतेचे घटक**:

1.1. **मौखिक भाषा विकास**:- लेखन व वाचनाची कौशल्ये विकसित करण्यासाठी मौखिक भाषेचा विकास महत्वाचा आहे.

1.2. **उच्चार शाखाची जाणीव**- शब्दांची लय व ध्वनीची जाणीव या बाबींचा योग्य वापर होणे गरजेचे आहे.

1.3. **सांकेतिक भाषा लिपी समजून घेणे**- यामध्ये छापील मजकुरांचे आकलन करण्याची क्षमता अक्षराचे ज्ञान,सांकेतिक भाषा, लिपी समजून घेणे, शब्द ओळखणे.

1.4. **शब्द संग्रह**- मौखिक शब्द संग्रह, वाचन/लेखन शब्दसंग्रह व शब्दांच्या विविध अर्थछटा

1.5. **वाचन व आकलन:मजकूराचे** वाचन करून अर्थ समजून घेणे, माहिती प्राप्त करणे व मजकुराचे स्पष्टीकरण करणे.

1.6.**वाचनातील ओघवतेपणा** : मजकूर अचूकपणे व लयबद्ध वाचणे, अभिव्यक्ती व आकलन.

1.7.**लेखन**: अक्षरे व शब्द लिहिणे, अभिव्यक्तीसाठी लिहिणे याची क्षमता.

1.8.**आकलन:-छापील** मजकूर / पुस्तके यामुळे आकलन कौशल्ये विकसित होण्यास मदत.

1.9.**वाचन संस्कृती / वाचनाकडे कल:-यामध्ये** विविध तऱ्हेची पुस्तके व इतर वाचन साहित्य

वाचण्याकडे कल असणे.

2. **पायाभूत संख्या साक्षरता, संख्याज्ञान व गणितीय कौशल्ये**:

पायाभूत संख्या साक्षरता म्हणजे दैनंदिन प्रश्न सोडवण्यासाठी साध्या संख्यात्मक कल्पनांचा वापर करण्याची क्षमता. संख्या पूर्व व संख्या कल्पनेचा विकास, तुलना करण्याचे ज्ञान व कौशल्य, क्रमशः मांडणी करणे,आकृतीबंध/संरचना ओळखणे व त्याचे वर्गीकरण, या बाबी प्राथमिक वर्गात गणित अध्ययनाचा पाया घालतात.

3.**प्रारंभिक गणिताचे दृष्टीकोन**:

- **संख्या पूर्व**:- गणन व संख्या ज्ञान
- **संख्या व संख्येवरील क्रिया**:- दशमान पध्दतीचा वापर, संख्येवरील क्रियांवर प्रभुत्व संपादन करणे.
- **गणना करणे**: तीन अंकी संख्यांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या गणितीय क्रिया करण्याच्या पद्धती समजावून घेणे व त्याचा उपयोग करणे.
- **आकार व अवकाश याबाबत समजून घेणे**:- तीन अंकी संख्यांपर्यंतची सोपी आकडेमोड करून त्यांच्या विविध संदर्भातील दैनंदिन कार्यात उपयोग करणे
- **नमुना संरचना-आकार** व अवकाशातील वस्तु समजून घेण्यासाठी संबंधित शब्द संग्रह शिकणे.

4.**समावेशित शिक्षण**: या अभियाना अंतर्गत विशेष शैक्षणिक आवश्यकता असलेल्या व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत शिक्षक व व्यवस्थेतील सर्व घटकांनी खालील बाबी करणे आवश्यक आहे.

- समतेचा दृष्टीकोन ठेऊन एकेका छोट्या समुहाला शिकवण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अधिक वेळ द्यावा लागेल.

- समावेशक शिक्षणाचा दृष्टिकोन हा वेगवेगळ्या पद्धती अवलंबण्याचा व निर्धारित लक्ष्य साध्य करण्यासाठी मदतीचा असला पाहिजे.
- विद्यार्थ्यांबरोबर व्यक्तिगत स्नेह निर्माण करणे व वर्ग अध्यापना पूर्वी विद्यार्थ्यांच्या स्वस्थ, आनंदी व्यक्तिमत्वसाठी आत्मविश्वास व स्वयं प्रोत्साहन यावर लक्ष केंद्रित करणे.
- संपादणूक तपासण्यासाठी नाविन्यपूर्ण पद्धती व दृष्टीकोनाचे अवलंबन करणे.
- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अध्यन शैलीशी जुळवून घेण्यासाठी अधिक परिश्रमाची आवश्यकता आहे.

5. **मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाचे आधारस्तंभ** :

राज्यात या अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी सहा प्रमुख आधारस्तंभ ठरविण्यात येत आहेत.प्रत्येक विद्यार्थ्यास इयत्ता तिसरीपर्यंत पायाभूत लेखन वाचन व गणितीय कौशल्य प्राप्त होतील. हे ध्येय सन 2026-27 पर्यंत साध्य होईल. कोणतेही मूल त्याच्या शैक्षणिक प्रवासात मागे राहणार नाही व पुढील आयुष्यात त्याच्या व्यक्तिमत्वावर नकारात्मक परिणाम होणार नाही.यासाठी प्रत्येक स्तंभ संयुक्त भूमिका पार पाडेल.

6 .**गृह अध्यापन आणि स्वयंशिक्षण**:

कोविड19 या महामारीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेमध्ये पालकांना महत्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागत आहे. केवळ तंत्रज्ञानाद्वारे 100% विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे अशक्य आहे, हे दिसून आले आहे. त्यासाठी ऑफलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी नवीन पध्दतीचा वापर केला पाहिजे.

विद्यार्थ्यांनी घरी शिकणे यामध्ये पालकांची भूमिका महत्वाची आहे. त्यासाठी शाळेने तसेच पालकांनी भरपूर छापील साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे. जलद वाचन, संख्या साक्षरता व पाढे यासाठी वाचन साहित्य व कार्यपुस्तिका इत्यादी सामग्री शाळेत आणि घरी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी समग्र शिक्षा, STARS प्रकल्प व स्थानिक स्वराज्य संस्था पुरेशी तरतूद उपलब्ध करतील, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ही गट व ग्रामपंचायत यांना छापिल साहित्य व सराय तक्ते तयार करून विद्यार्थ्यांना देण्यासाठी CSP व अशासकीय संस्था (NGO) यांची मदत घेण्यात येईल. संगणक व भ्रमणध्वनी (मोबाईल) यांचा शिक्षणात वापर करावा लागेल. मात्र दुर्गम भागातील विद्यार्थी व संगणक साक्षर विद्यार्थी यांच्यातील दरी कमी करावी लागेल.

शाळेच्या ग्रंथालयातून छोटी गोष्टीची पुस्तके, अध्यापन अध्ययन साहित्य या आधारे पालक मुलांबरोबर घरी नियमीतपणे कोणत्या कृती करू शकतात त्याची यादी तयार करून पालकांना प्रोत्साहन दिले जाऊ शकते. यासाठी खालील उपक्रम आयोजित करता येतील.

- काही सोप्या कृती, चिठ्ठया (लेबल) वाचणे, वर्तमानपत्रातील, नोटांवरील, कॅलेंडरवरील शब्द वाचणे तसेच पुस्तके वाचणे, खेळ खेळणे, गाणी व कविता म्हणणे, आवाजातील योग्य चढ उतारासह गोष्टी सांगणे व मुलांबरोबर संवाद साधणे.
- छापील साहित्याबरोबरच जे पालक शिकण्याचे अन्य साहित्य प्राप्त करू शकतात व ज्यांचेकडे अंतरजाल (इंटरनेट) उपलब्ध आहे असे पालक भ्रमणध्वनीवर शैक्षणिक ॲप डाऊनलोड करून मुलांना मार्गदर्शन करु शकतात. असा संगणकीय मजकूर पाठ्यपुस्तकांमधून क्यूआर कोडद्वारा स्कॅनिंग करीता उपलब्ध आहे. वॉट्सॲप आधारित स्वाध्याय, ऑनलाईन वर्ग व राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद (NCERT) व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) यांच्याद्वारा उपलब्ध करून दिलेली यूट्युबवरील दृक-श्राव्य साधने शैक्षणिक मूल्यमापनाचे सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी पालकांना उपलब्ध असतील. त्याचप्रमाणे पालकांनी मुलांना प्रसारमाध्यमे (Mass Media), दूरदर्शन, रेडिओ यावरील कार्यक्रम व दूरध्वनीद्वारे परस्पर संपर्क, ध्वनीवर्धकावर मोठ्याने वाचन (2-3 मुलांच्या गटामध्ये) याचा वापर करायला प्रोत्साहन दिले पाहिजे.
- गाव/मोहल्ला/वस्ती या स्तरावर ग्राम शिक्षण मंडळे गठित करून यामध्ये लहान मुलांमध्ये वाचन, आकलन, लेखन व संख्या आकलन सुधारावे, यासाठी गावातील उच्च माध्यमिक स्तरावरील पदवीधर विद्यार्थी आणि लहान मुलांच्या छोटया छोटया गटामध्ये चर्चा घडवून आणता येतील.
- सहाध्यायी शिक्षण व गट शिक्षण (भावंडे किंवा जवळचे मित्र याबरोबर शिक्षण) याद्वारे स्वयंशिक्षणाला प्रोत्साहन देता येईल.
- राज्य/जिल्हा स्तरावरून सुरु केलेल्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी त्यांना प्रोत्साहन व पाठिंबा देणे यासाठी पालकांचे सक्षमीकरण करावे
- गुगल रोड अलोंग, पिंटरेस्ट शब्द जुळवणे खेळ इत्यादी अपचा उपयोग करुन ओघवते वाचन करण्याची क्षमता वृन्धिंगत करता येईल. त्यातून विद्यार्थ्यांची ओघवत्या वाचनामधील प्रगती पाहता येईल.

7. **सुकाणू समितीचे गठन, भूमीका व जबाबदारी** :

मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी **प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या अध्यक्षतेखाली** जिल्हापातळीवर सुकाणू समिती गठीत करण्यात आली आहे. किमान तीन महिन्यातून एक बैठक घेऊन सदर समिती मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान या अभियानाचे दिशादर्शन करेल.

| संस्थेचे नाव | भूमिका व जबाबदारी | विवरण |
|---|---|---|
| स्थानिक स्वराज्य संस्था | अंमलबजावणी करण्यासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करणे व अभियानाचे सनियंत्रण करणे. | समग्र शिक्षाचे समन्वयाने या अभियानाचे जिल्हास्तरावर व्यवस्थापन , सनियंत्रण प्रशिक्षण, अध्ययन-अध्यापन सामुग्री यासाठी अंदाज पत्रकीय तरतूद व खचाचे व्यवस्थापन<br>• शाळा स्तरावर निधी वितरण व उपयोगिता<br>• अभियानाची परिणामकारकता दरमहा तपासून माहितीचे संकलन, विश्लेषण द त्यानुसार कृती कार्यक्रमाचे नियोजन अंमलबजावणी<br>• वेळोवेळी प्रगतीसाठी आढावा बैठका<br>• इयत्ता 1 ली ते 3 री साठी 100 शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे याची खात्री करणे.<br>•यापूर्वीचे जिल्हा गुणवत्ता कक्ष या शासन निर्णयाने व्यपगत करण्यात येत आहेत. |
| जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था | शाळा व शिक्षक यांना प्रशिक्षण व विदया विषयक मदत | • गट व समूह साधन स्तरावर शिक्षका प्रशिक्षण व प्रशिक्षणाचा परिणाम तपासणे.<br>• वर्ग व शाळा भेटीसाठी केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक आणि साधन ब यांना व्यावसायिक विकासासाठी प्रशिक्षण सक्षमीकरण. |

| | | |
|---|---|---|
| | | • पालक सहभागासाठी जागरुकता निर्मार करणाऱ्या उपक्रमांचे नियोजन अंमलबजावणी करणे.<br>• प्रशिक्षणातून Learning Loss टाळण्यास नियोजन करणे.<br>• अभियानाशी संबंधित सर्व घटकांशी समन्वय व सहकार्य करणे.<br>• यशोगाथांचे संकलन व दस्तऐवजीकरण करणे. |
| गट व केंद्र साधन स्तर | गट व समूह स्तरावर अंमलबजावणी | • या अभियानाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक मदत, सनियंत्रण, माहितीचे संकलन करणे.<br>• विशेष गरजा असलेली व संथ गतीने शिक मुले यांना वैयक्तिक मार्गदर्शन व मदत करणे वर्ग निरीक्षण व मार्गदर्शन करणे.<br>•या अभियानातील यशस्वी ठरलेल्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोगांचे परस्पर आदान प्रदान करणे. |

8. **अभियानाविषयी जाणीव जागृती (माहिती, शिक्षण व संपर्क**):

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाविषयी अधिक जागरूकता निर्माण करण्यासाठी खालील बाबी केल्या जाव्यातः

- मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाबाबत माहिती आणि निकालांचा आलेख सर्व शाळा ठळकपणे सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करतील.
- सदर अभियानातून शाळेतील शिक्षणाद्वारे विषयवार व इयत्तावार प्राप्त करावयाची अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes) शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांना अवगत केल्या जातील.
- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या माध्यमातून शाळा, शिक्षक व पालक यांचेकरीता भित्तीपत्रके, पत्रे, सामाजिक माध्यमे संदेश, आकाशवाणी व दूरदर्शन वरील भाषणे इत्यादी संपर्क सामग्री तयार करून प्रसारित करेल.
- मुलांना घरी शिकण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित सोपी सामग्री, गमतीदार अशा कृती व कृतीपुस्तिका उपलब्ध करण्यात येतील.
- सदर अभियान ही एक लोकचळवळ होण्यासाठी वेळोवेळी ग्राम जागरूकता बैठक/सभा, शालेय मेळा, पुस्तक जत्रा, वाचनाचे कार्यक्रम, गोष्टींचा मेळा, गणित मेळा इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल. यामध्ये ग्रामपंचायत/शाळा व्यवस्थापन समिती यांची भूमिका महत्वाची असेल.

9. **आर्थिक तरतूद व त्याचा वापर**:

मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानासाठी समग्र शिक्षा व इतर संबंधित प्रकल्प (उदा. STARS) वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकातील तरतुदीचे अधीन राहून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. समग्र शिक्षा च्या नियमावलीनुसार निधी वितरण व लेखा परिक्षण केले जाईल. याव्यतिरिक्त स्थानिक स्वराज्य संस्था त्यांचकडील तरतूद अन्य उपक्रमांसाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देऊ शकतील.

**निपुण भारत मुलभूत साक्षरता व संख्या या विषयाच्या अधिक माहितीसाठी शासन निर्णय क्र.संकीर्ण**-2021 /**प्र.क्र**179 /**एस.डी** -6 **दि**.27 **ऑक्टोबर** 2021**चे अवलोकन करावे**.

## योजनेचे नाव - लोकप्रतिनिधी प्रशिक्षण

**योजनेचे स्वरूप -**

समग्र शिक्षा अंतर्गत शाळा व्यवस्थापन समिती बळकट करणे, शाळेस मिळणा- या सोयीसुविधांचा विनियोग योग्य प्रकारे करणे, शालेय गुणवत्ता वाढवणे व टिकून ठेवणे हा मानस सदर उपक्रमाचा आहे.

**योजनेचे निकष -**

प्राथमिक स्तरावर शाळा व्यवस्थापन समिती व माध्यमिक स्तरावर शाळा व्यवस्थापन विकास समिती सदस्य यांचे सक्षमीकरण कारण्यासाठी शाळा / केंद्र / तालुका/ जिल्हा / विभाग व राज्यस्तवर मेळावे, प्रशिक्षण व त्रैमासिक बैठकांचे आयोजन या उपक्रमात करण्यात येते. त्याच प्रमाणे राज्य स्तरावरून प्राप्त होणा-या सूचनेनुसार अंमलबजावणी करण्यात येते.

**योजनेचे नाव - सामावेशित शिक्षण (विद्यार्थ्यांसाठी दिव्यांग)**

**योजनेचे स्वरूप -**

समावेशित शिक्षण उपक्रम सर्व २१ दिव्यांग प्रवर्गातील बालवाडी ते १२ वी व ० ते १८ वयोगटातील विशेष गरजा धारक दिव्यांग विद्यार्थ्यांना घरापासुन शाळेपर्यंत जास्त अंतर असणे, संसाधन कक्ष येणे जाणे, थेरपीसाठी जाण्यासाठी मदत घेणे व मुलींसाठी प्रोत्साहन व अंध विद्यार्थ्यांना वाचक इ. कारणांसाठी अनुदान प्राप्त प्रस्तावानुसार देण्यात येतोपुस्तके ब्रेल आधारीत पाठ्यपुस्तकावर चेअर मोडिफाय विद्यार्थ्यांना दिव्यांग स्वरुपाच्या तीव्र या असणा समस्या चलनास हलन ., मोठ्या अक्षरातील पुस्तके, कुबड्या, व्हील चेअर, रोलेटर, ट्रायसिकल, कॅलिपर, श्रवणयंत्र, सीपी चेअर, ब्रेल किट, स्मार्ट केन, डेझी प्लेअर इ सन .येतात करण्यात वितरित साहित्य . -२०२२२३ या शैक्षणिक वर्षात ११३२० विशेष गरजा धारक विद्यार्थी आहेत

**योजनेचे निकष -**

1. **प्रवास भत्ता -** विशेष गरजा धारक दिव्यांग विद्यार्थ्यांना घरापासुन शाळेपर्यत जास्त अंतर असणे, संसाधन कक्ष येणे जाणे, थेरेपीसाठी जाणे इ.कारणांसाठी प्रवास भत्ता अनुदान प्राप्त प्रस्तावानुसार देण्यात येतो.
2. **मदतनिस भत्ता -** विशेष गरजा धारक दिव्यांग विद्यार्थ्यांना घरापासुन शाळेपर्यत, थेरेपीसाठी नेणे आणण्यासाठी प्राप्त प्रस्तावानुसार मदतनीसास मदतनीस भत्ता अनुदान प्राप्त प्रस्तावानुसार देण्यात येतो.
3. **प्रोत्साहन भत्ता -** इ. 1ली ते 12 वी च्या 40 टक्के व त्यापुढील दिव्यांगत्व प्रमाणपत्र असणा-या विशेष गरजा धारक विद्यार्थीनींसाठी मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढावे यासाठी प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो.
4. **वाचक भत्ता -** सदर भत्ता शाळेतील पूर्णतः अंध व अंशतः अंध विद्यार्थ्यांना शाळेतील पाठयपुस्तके व संदर्भीय पुस्तकांमधील संकल्पना स्वतंत्रपणे समजाव्यात अशा वेळी वाचकाची गरज असल्यास अशा विद्यर्थ्यांना वाचक भत्ता देण्यात येतो.
5. **मॉडिफाय चेअर -** हलन चलनास समस्या असणा-या तीव्र स्वरुपाच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळेत अनुकुलीत बैठक व्यवस्था करण्यासाठी शाळास्तरावर अनुदान दिले जाते.
6. **ब्रेल बुक -** पाठ्यपुस्तकावर आधारीत ब्रेल पुस्तके अंध विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येतात.

7. **लार्ज प्रिंट -** पाठ्यपुस्तकावर आधारीत ठळक अक्षरातील (मोठ्या अक्षरातील)पुस्तके मंददृष्टी विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येतात.
8. **अलिम्को साहित्य -** राज्य स्तरावरुन प्राप्त वेळापत्रकानुसार अलिम्को शिबीरानुसार विद्यार्थ्यांना कुबड्या, व्हील चेअर, रोलेटर, ट्रायसिकल, कॅलिपर, श्रवणयंत्र, सीपी चेअर, ब्रेल किट, स्मार्ट केन, डेझी प्लेअर इ. साहित्य वितरित करण्यात येतात
9. **शिक्षक व पालक प्रशिक्षण -** नविन प्रवेशित झालेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांना उपक्रमातुन दिले जाणा-या सोई सवलती व अध्यापनाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण घेण्यात येते.
10. **वैद्यकिय शिबीरे -** दिव्यांग विद्यार्थ्यांचे कार्यात्मक मुल्यमापन व वैद्यकिय निदान व उपचार शिबिर आयोजित करण्यासाठी गट शिक्षणाधिकारी यांना अनुदान देण्यात येते.
11. **शस्त्रक्रिया -** अस्थिव्यंग, नेत्र, वाचादोष, कर्णदोष विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रिया मा. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय यांच्या मार्गदर्शनाने करण्यात येतात.
12. **थेरेपी सेवा -** तालुकास्तरावर थेरपीस्ट उपलब्ध नसल्याने प्रत्येक तालुक्यात विद्यार्थ्यांना थेरपी सेवा देण्यासाठी निधी देण्यात येतो.
13. **जाणीव जागृती -** समावेशित शिक्षण उपक्रमाची जाणीव जागृती होण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जातात.
14. **विशेष शिक्षक मार्गदर्शन -** दिव्यांग विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन करण्यासाठी आपल्या जिल्ह्यात एकूण 86 विशेष शिक्षक कार्यरत आहे. यांच्या माध्यमातुन दिव्यांग विद्यार्थ्यांना व वर्ग शिक्षकांना सामान्य शाळेतच अध्यापन सहाय्य केले जाते.

**<u>प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना :-</u>**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना (पूर्वीची शालेय पोषण आहार योजना) ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे, शाळेतील विद्यार्थी गळती थांबविणे, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे तसेच शाळेतील विद्यार्थ्यांचा पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविणे ही योजनेचे उद्दिष्ट आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची शालेय पोषण आहार) योजनांतर्गत इ.1 ली ते 5 वी मधील प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 450 उष्मांक आणि 12 ग्रॅम प्रथिने युक्त तसेच इ.6 वी ते 8 वी मधील उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 700 उष्मांक आणि 20 ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो.

केंद्र शासनाकडून प्रतिदिन प्रतिविद्यार्थी 100 ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी 150 ग्रॅम तांदूळपुरविण्यात येतो.

**योजनेचे नाव**- भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा

**स्वरुप**-महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2020/प्र.क्र.143/एसडी-6 दि.26 ऑक्टोबर 2020 व दि.5 मार्च 2021 अन्वये मार्च 2020 मध्ये पार पडलेल्या राज्याच्या द्वितीय अर्थसंकल्पीय अधिवेशनात घोषणा केल्यानुसार शालेय शिक्षण विभागाने पहिल्या टप्प्यात राज्यात 488 जिल्हा परिषद शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**निकष** -राज्यस्तरावरून अहमदनगर जिल्ह्यातील 16 शाळांची आदर्श शाळेसाठी निवड करण्यात आली आहे.

**भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा**

| अ.क्र | तालुका | शाळा |
|---|---|---|
| 1 | अकोले | जि प प्राथ शाळा कळस बु. |
| 2 | अकोले | जि प प्राथ शाळा वीरगाव |
| 3 | जामखेड | जि प प्राथ शाळा देवदैठण |
| 4 | कर्जत | जि प प्राथ शाळा रेहेकुरी |
| 5 | कोपरगाव | जि प प्राथ शाळा धोत्रे |
| 6 | नगर | जि प प्राथ शाळा भोरवाडी |
| 7 | मनपा | जि प प्राथ शाळा रेणुकानगर |
| 8 | नेवासा | जि प प्राथ शाळा खुपटी |
| 9 | पारनेर | जि प प्राथ शाळा हंगा |
| 10 | पाथर्डी | जि प प्राथ शाळा मिडसांगवी |
| 11 | राहाता | जि प प्राथ शाळा गोल्हारवाडी |
| 12 | राहुरी | जि प प्राथ शाळा कोंढवड बु |
| 13 | संगमनेर | जि प प्राथ शाळा पिंप्रीलौकी अझमपूर |
| 14 | शेवगाव | जि प प्राथ शाळा बालमटाकळी |
| 15 | श्रीगोंदा | जि प प्राथ शाळा हंगेवाडी |
| 16 | श्रीरामपूर | जि प प्राथ शाळा उक्कलगाव |

**योजनेचे नाव -** PM SHRI Schools for Rising India

**योजनेचे स्वरूप -**

1. शासकीय व स्थानिक संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या शाळांना निकषानुसार यामध्ये सहभागी होता येईल. NEP २०२० च्या शिफारशी लक्षात घेऊन या शाळांमध्ये सर्वसमावेशक शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या पुरेशा आणि सुरक्षित पायाभूत सुविधांसह विद्यमान पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण करण्यात येईल.
2. सर्व शाळांमध्ये कार्यरत स्वच्छतागृहे, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छ आणि आकर्षक जागा, वीज, संगणकीय उपकरणे, इंटरनेट, ग्रंथालये, शैक्षणिक साहित्य, भाषा गणित, विज्ञान प्रयोगशाळा, आणि क्रीडा आणि मनोरंजनाची साधने, सौर पॅनेल आणि एलईडी लाइटिंगचा वापर करून ऊर्जा कार्यक्षम, नैसर्गिक शेतीसह पोषण बागा, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त Water, Sanitation Facilities, Waste Management, Safety Provisions, rainwater harvesting, water auditing जलसंधारण आणि कापणी, परंपरा / पद्धतींचा अभ्यास यासारख्या पर्यावरणपूरक बाबींचा समावेश करून या शाळा ग्रीन स्कूल म्हणून विकसित केल्या जातील.
3. ICT, smart classrooms and digital libraries, Science Technology Engineering Maths innovation Centres, Balvatika and Foundational Literacy and Numeracy, vocational education, Psychological and Career Counselling, Transportation Facilities, Special Equity Projects, Sanitary pad vending and incinerators, self defence training इत्यादी सुविधा उपलब्ध केल्या जातील.

**योजनेचे निकष -**

1. PM SHRI अंतर्गत शाळेची निवड प्रामुख्याने या निकषांच्या आधारे केली जाईल. ज्यामध्ये. UDISE+ कोड असणाऱ्या शासकीय / स्थानिक संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा ज्यांची पटसंख्या ही राज्य/जिल्ह्याच्या सरासरी पेक्षा जास्त असणाऱ्या शाळा.
2. शाळेची स्वतःची पक्की इमारत असणारी, मुला-मुलींसाठी प्रत्येकी किमान एक स्वतंत्र | शौचालय, पिण्याच्या पाण्याची सोय आणि हात धुण्याची सोय, शाळेत कार्यरत स्थितीत वीज पुरवठा असणाऱ्या शाळा.
3. Barrier free access - Ramps, Library/library corner facilities / Sports equipment ची उपलब्धता असणाऱ्या शाळा.
4. पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित क्षेत्रात असणारी शाळा.

5. शाळेतील शिक्षकांनी NISHTHA प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केलेला असावा.
6. सर्व शिक्षकांकडे विद्यमान मार्गदर्शक तत्वांनुसार फोटो ओळखपत्र असावे.
7. शाळेने प्राथमिक आरटीई कायद्यानुसार विद्यार्थी शिक्षक प्रमाण आणि विषय शिक्षकांसह माध्यमिक आणि उच्च माध्यमिक वर्गासाठी समग्र शिक्षा निकषांनुसार विद्यार्थी शिक्षक प्रमाण निकषांची पूर्तता केलेली असावी.
8. मुलांची गळती रोखण्यासाठी व दिव्यांग मुलांना सर्व समावेशक शिक्षण देण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले असावेत.
9. आरटीई कायद्यानुसार शाळा व्यवस्थापन समिती गठित केली गेली असावी.
10. शाळेच्या पायाभूत सुविधांच्या प्रगतीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी योगदान देण्याची इच्छा व्यक्त केलेली असावी.
11. राज्याने निवडलेल्या शाळांचा PM SHRI शाळांमध्ये विकास करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळ उपलब्धता, विद्यार्थी शिक्षक प्रमाण राखणे, करून देण्यासाठी वचनबद्धता (commitment) केंद्र शासनास देणे आवश्यक राहणार आहे.
12. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षक भरती, बदली आणि carrie' progression प्रणालीची पारदर्शक प्रक्रिया राबविणे महत्वाचे राहणार आहे.
13. पारदर्शक शिक्षक व्यवस्थापन प्रणालीचा (teacher management system) अवलंब करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन दिले जाईल.